**ठळक बातम्या**

- तंत्रज्ञानातल्या प्रगतीमुळे ग्रामीण आणि शहरी भागातल्या आरोग्य व्यवस्थेतली दरी संपुष्टात आणण्याची गरज राष्ट्रपतींकडून व्यक्त

- जलसंवर्धनासह नऊ क्षेत्रांच्या विकासासाठी नागरिकांनी समर्पण भावनेतून प्रामाणिकपणे काम केलं तर विकसित भारत ही संकल्पना सत्यात उतरेल, असा प्रधानमंत्र्यांचा विश्वास

- भाजपा नेते सम्राट चौधरी यांनी घेतली बिहारच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ

- अमरावतीमधल्या अल्पवयीन मुलींच्या छळ प्रकरणाची चौकशी करण्यासाठी SIT ची स्थापना, नाशिकमध्ये टीसीएसच्या बीपीओमध्ये झालेल्या लैंगिक छळ प्रकरणी राष्ट्रीय महिला आयोगाकडून समितीची स्थापना

**आणि**

- युरोपियन गर्ल्स गणित ऑलिम्पियाडमध्ये भारताची तीन पदकांची कमाई, मुंबईच्या श्रेया मुंदडानं पटकावलं सुवर्णपदक

**<><><><><>**

तंत्रज्ञानातल्या प्रगतीमुळे ग्रामीण आणि शहरी भागातल्या आरोग्य व्यवस्थेतली दरी संपुष्टात यायला हवी अशी अपेक्षा राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी व्यक्त केली. या अनुषंगाने नागपूर एम्स काम करत आहे, असं त्या म्हणाल्या. नागपूरच्या एम्स अर्थात अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेच्या दुसऱ्या दीक्षान्त समारंभा त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. देशातल्या पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी केंद्र सरकारनं गेल्या दहा वर्षांत अनेक उपाययोजना आणल्या, असं त्या म्हणाल्या. यावेळी त्यांनी आयुष्मान भारत जन आरोग्य योजनेअंतर्गत दिल्या जाणाऱ्या सुविधांचाही उल्लेख केला.

**होल्ड बाईट राष्ट्रपती**

यावेळी राष्ट्रपतींनी आठ विद्यार्थ्यांना सुवर्ण पदक प्रदान केली.

राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमी इथं भारतीय महसूल सेवेच्या ७८ व्या तुकडीच्या प्रशिक्षण समापन समारंभातही राष्ट्रपती सहभागी झाल्या.

**<><><><><>**

जलसंवर्धन, नैसर्गिक शेती ते तंदुरूस्ती आणि सेवा अशा नऊ क्षेत्रांच्या विकासासाठी नागरिकांनी समर्पण भावनेतून प्रामाणिकपणे काम करावं म्हणजे विकसित भारत ही संकल्पना सत्यात उतरेल, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज म्हणाले. कर्नाटकच्या मांड्या जिल्ह्यात नागमंगला इथं आदिचुनचनगिरी महासंस्थान मठातल्या मंदिराचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. या नऊ क्षेत्रात निष्ठेनं काम करण्याची प्रतीज्ञा घेण्याचं आवाहनही त्यांनी उपस्थितांना केलं....

**होल्ड - बाईट - PM - KARNATAK**

सार्वजनिक आणि धार्मिक ठिकाणी स्वच्छता, स्थानिक उत्पादनांना चालना, कमी तेल वापरून केलेलं सकस अन्न खाणं या मुद्द्यावर त्यांनी भर दिला. गरीब आणि मागासवर्गीयांसाठी सेवा भावनेनं काम करा, असंही त्यांनी सांगितलं. त्यांनी यावेळी दोन पुस्तकांचं प्रकाशनही केलं.

**<><><><><>**

भाजपा नेते सम्राट चौधरी यांनी आज बिहारच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. बिहारचे ते २४ वे मुख्यमंत्री आहेत. भाजपाच्या नेतृत्त्वाखाली पहिल्यांदाच बिहारमध्ये सरकार स्थापन झालं आहे. राज्यपाल निवृत्त लेफ्टनंट जनरल सय्यद अता हसनैन यांनी पाटण्यातल्या लोकभवनात त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. संयुक्त जनता दलाचे विजय कुमार चौधरी आणि बिजेंद्र प्रसाद यांनी यावेळी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. त्यानंतर खातेवाटपही करण्यात आलं.

मुख्यमंत्री चौधरी यांनी गृह, सामान्य प्रशासन विभागासह २९ विभागांचा पदभार स्वीकारला. उप मुख्यमंत्री विजयकुमार चौधरी यांनी जलसंपदा आणि संसदीय कामकाज विभागासह दहा विभागांचा पदभार स्वीकारला. तर उप मुख्यमंत्री बिजेंद्र प्रसाद यांनी अर्थ, ऊर्जा मंत्रालयासह आठ विभागांचा पदभार स्वीकारला.

<><><><><>

पश्चिम बंगालमधे आगामी विधानसभा निवडणुकीसाठीच्या प्रचाराला वेग आाल आहे. सर्व पक्षांचे नेते सभा, रॅली, बैठका यांच्या माध्यमातून मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करत आहेत. तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख आणि मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी आज सिलिगुडी, जलपायगुडी इथं रोड शो केला. त्याआधी त्यांनी उत्तर दिनाजपूर इथं एका भव्य सभेला संबोधित केलं. पुनरीक्षणाच्या नावाखाली भाजपा लाखो नागरिकांना त्यांच्या मताच्या अधिकारापासून वंचित ठेवत असल्याचा आरोप त्यांनी यावेळी केला. भाजपा नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी उत्तर बंगालमधे चार प्रचारसभां घेतल्या. पश्चिम बंगालमधे भाजपाच्या नेतृत्वाखालचं सरकार स्थापन होताच गोरखा समुदायाचा प्रश्न सोडवला जाईल, असं आश्वासन त्यांनी दिलं. ते आज दार्जिलिंग इथल्या प्रचारसभेला दूरस्थ पद्धतीने संबोधित करत होते.

<><><><><>

छत्तीसगड राज्यात समान नागरी कायदा लागू करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळानं घेतला आहे. मुख्यमंत्री विष्णु देव साई यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय झाला. समान नागरी कायद्याचा मसुदा तयार करण्यासाठी निवृत्त न्यायाधीश न्यायमूर्ती रंजना प्रकाश देसाई यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचा निर्णयही आज झाला.

<><><><><>

अमरावती जिल्ह्यात अचलपूर–परतवाडा परिसरात अल्पवयीन मुलींचे अश्लील व्हिडिओ व्हायरल झाल्या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी पोलिसांनी SIT अर्थात

विशेष तपास पथकाची स्थापना केली आहे. १० पोलिस अधिकारी आणि ३६ कर्मचारी अचलपूरच्या सहाय्यक पोलीस अधीक्षकांच्या नेतृत्त्वाखाली या प्रकरणाची चौकशी करणार आहेत. याप्रकरणी पोलिसांनी मोहम्मद अयाझ याच्यासह एकूण ४ जणांना अटक केली आहे. त्यांनी सुमारे १८० अल्पवयीन मुलींना प्रेमाच्या जाळ्यात फसवून त्यांचे अश्लील व्हिडीओ काढले. त्यानंतर या व्हिडीओच्या आधारे त्यांना ब्लॅकमेल केलं आणि वेश्याव्यवसायात ढकललं असा आरोप आहे.

**<><><><><>**

नाशिकमध्ये टीसीएसच्या बीपीओमध्ये झालेल्या लैंगिक छळ प्रकरणी तथ्यांची पडताळणी करण्यासाठी राष्ट्रीय महिला आयोगानं एका समितीची स्थापना केली आहे. शुक्रवारी ही समिती नाशिकमध्ये कंपनीच्या कार्यालयाला भेट देणार आहे. १० दिवसात या समितीला अहवाल देण्याचे आदेश आयोगानं दिले आहेत. मुंबई उच्च न्यायालयाच्या सेवानिवृत्त न्यायाधीश न्यायमूर्ती साधना जाधव या समितीच्या अध्यक्ष असतील. हरियाणाचे माजी पोलीस महासंचालक बी. के. सिन्हा, सर्वोच्च न्यायालयातल्या वकील मोनिका अरोरा आणि आयोगाच्या समन्वयक लीलावती या समितीमध्ये आहेत.

**<><><><><>**

फ्रान्समधल्या बोर्डो इथं झालेल्या १५ व्या युरोपियन गर्ल्स गणित ऑलिम्पियाडमध्ये मुंबईच्या श्रेया मुंदडा हिनं सुवर्णपदक पटकावलं. त्यामुळे पाहुणा संघ म्हणून सहभागी झालेल्या भारताला या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत पहिल्यांदाच सुवर्णपदक मिळालं. या स्पर्धेत भारतीय संघानं एक सुवर्ण, एक रौप्य आणि एक कांस्य अशा तीन पदकांची कमाई केली. केरळच्या संजना चाको हिला रौप्य पदक, तर तामिळनाडूच्या शिवानी कुमार हिला कांस्य पदक मिळालं. ९ ते १५ एप्रिल दरम्यान झालेल्या या स्पर्धेत ६७ देशातल्या २६० विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या.

**<><><><><>**

महिला आरक्षण विधेयक समतोल असून प्रत्येक राज्याच्या, समुदायाच्या आणि प्रदेशाच्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी समर्थ असल्याचं संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी म्हटलं आहे. नारी शक्ती वंदन अधिनियम विधेयकातल्या दुरुस्त्यांवर चर्चा करण्यासाठी आणि पारित करण्यासाठी उद्यापासून संसदेचं विशेष अधिवेशन सुरु होणार असल्याचं रिजिजू यांनी सांगितलं.

**<><><><><>**

इराण आता शांतता करारावर सहमत होण्याच्या बेतात असून त्यांच्यासोबतचं युद्ध संपण्याच्या मार्गावर आहे, असं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. आज प्रसारित झालेल्या एका मुलाखतीत ट्रम्प यांनी हा दावा केला. इराणच्या बंदरांची नाकेबंदी सुरू केल्यावर ३६ तासांच्या आत पूर्णपणे लागू झाल्याचं अमेरिकेच्या सेंट्रल कमांडनं सांगितल्यानंतर काही तासांनी ट्रम्प यांनी हे वक्तव्य केलं आहे. दुसरीकडे, अमेरिकेनं इराणच्या बंदरांवर नौदल नाकेबंदी सुरू ठेवली, तर इराणचं सैन्य लाल समुद्रासोबतच आखात आणि ओमानच्या समुद्रातला व्यापार रोखेल, असा इशारा इराणच्या लष्कराच्या सेंट्रल कमांडच्या प्रमुखांनी दिला आहे. इराण आपल्या राष्ट्रीय सार्वभौमत्वाचं आणि हितांचं रक्षण करण्यासाठी निर्णायक कारवाई करेल, असंही त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेटमध्ये आज बंगळुरूच्या एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू आणि लखनौ सुपर जायंट्स यांच्यात सामना सुरु आहे. रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा लखनौ सुपर जायंट्सच्या ७ षटकात २ बाद ४० धावा झाल्या होत्या.

**//<><><><><>//**